**बॉम्बे चष्माघर**
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
☎-235222,मो.9021853108

# आपला महाराष्ट्र

₹२.०० संस्थापक - लोकमित्र भाई मदाने www.aplamaharashtra.in
संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१०० ■ बुधवार १५ जानेवारी २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४
Post Regd. No./DHL/53-24-26

उत्कृष्ट क्वालिटी
खारिक २००/- रु.किलो
खोबरा २४०/- रु.किलो
गावरानी तिळ १६० रु.किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

## संतोष देशमुख खून व खंडणी प्रकरणातून वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत कारवाई

**बीड, दि.१४- आताची मोठी बातमी समोर येत आहे. वाल्मिक कराड याच्यावर मोक्का लावण्यात आला आहे. त्याचा ताबा सीआयडीने मागितला आहे. कराडचा ताबा मिळावा यासाठी अर्ज दाखल करण्यात आला आहे. यामुळे वाल्मिक कराड याच्या अडचणीत वाढ झाली आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणात त्याचा ताबा मिळवण्यासाठी सीआयडीने कोर्टासमोर अर्ज दाखल केला आहे.**





दरम्यान, वाल्मिक कराडवर मोक्का लावण्यात आल्यानंतर आता सीआडीने कोर्टात अर्ज केला आहे. सीआयडीने खुनाच्या गुन्ह्यासाठी वाल्मिक कराडची चौकशी करायची आहे. त्यासाठी वाल्मिक कराडला ताब्यात द्या अशी विनंती सीआयडीने केली आहे. त्यामुळे वाल्मिक कराडला सीआयडीच्या ताब्यात देणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**परळी बंदची हाक**

वाल्मिक कराड याला मोक्का लागल्यानंतर समर्थक आक्रमक झाले. त्यांनी सकाळपासूनच तीव्र आंदोलन केले होते. समर्थक आता आक्रमक झाले आहेत. त्यांनी परळी बंदची हाक दिली आहे. आज वाल्मिक कराड यांच्या आईने सुद्धा पोलिस ठाण्याबाहेर त्यांना सोडावे यासाठी ठिय्या आंदोलन केले. शहरातील विविध दुकाने आणि आस्थापनं बंद करण्यात आली आहे. परळीचे सर्व व्यवहार हे ठप्प झाले आहेत.

**कोणालाही सोडायचे नाही - अजित पवार**

अजित पवार म्हणाले, मुख्यमंत्री आणि आम्ही आधीच ठरवले होते की, या प्रकरणात हायगय न करता कुणालाही सोडायचे नाही. जे दोषी असतील, जे कुणी संबंधित असतील, ते कुणीही असले तरी त्यांच्यावर कारवाई करायची. या घटनेला महिना होऊन गेला, त्यामुळे संतोष देशमुख यांचे कुटुंबिय चिंतेत होते. पण पोलीस, न्यायालय, एसआयटी त्यांच्या पद्धतीने काम करत आहेत. संतोष देशमुख यांची अतिशय निर्घृण पद्धतीने हत्या झाली. शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या महाराष्ट्रात अशी घटना कुणीच खपवून घेणार नाही. कुणीही दोषी असले तरी त्यांचे धागे-दोरे चौकशीत मिळाले, तर त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे.

अजित पवार पुढे म्हणाले की, वाल्मिक **(पान ३ वर)**

## मांजाने गळा कापल्याने बालकाचा दुर्दैवी मृत्यू

नंदुरबार, दि.१४ (प्रतिनिधी)- मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर पतंगोत्सवाचा जल्लोष सुरू असतांना एका सात वर्षीय बालकाचा मांजाने गळा चिरुन मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बाबा सिरोर्ट जवळ घडल्याने सणावर विरजण पडले.तर मांजामुळे एक ज्येष्ठ. महिला जखमी झाली असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

कार्तिक एकनाथ बोरवे हा सात वर्षीय बालक आजोबांसोबत मोटारसायलवर असतांना मांजाने त्याचा गळा चिरला गेला.त्याला तात्काळ शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. तसेच नंदुरबार शहरातील किलबील हॉस्पीटलजवळील रस्त्यावर एका पंच्चावन वर्षीय महिलेच्या पायात मांजा अडकून त्या जखमी झाल्या. त्यांच्यावर पंधरा टाके बसले. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपयचार सुरु आहेत.

पंतगोत्सवामुळे **(पान ४ वर)**

### आयुक्तांनी अधिकाऱ्यांना धरले धारेवर

## धुळे मनपामध्ये सुपारी बहाद्दरांची संख्या वाढली ठेकेदारांची वाढती अरेरावी खपवून घेणार नाही

**धुळे, दि.१४- ठेकेदाराने मनपाच्या शिपाईला कानशिलात लगावली. असे प्रकार होणार नाही याची काळजी घ्या. शिपायाला मारले म्हणजेच आयुक्ताला मारले. मनपात सुपारी बहाद्दरांची संख्या वाढली आहे. गर्दी कंट्रोल करा. शिस्त प्रत्येकाने पाळली पाहिजे. ठेकेदारांची अरेरावी खपवून घेतली जाणार नाही. मनपा धर्मशाळा नाही, ही घटना म्हणजे निंदनीय बाब आहे. गरीब कर्मचाऱ्याला मारहाण झाली, सर्व एकत्र का आले नाही ? साधा निषेधही नोंदवला नाही ? अशी प्रश्नांची सरबत्ती करत मनपा आयुक्त अमिता दगडे-पाटील यांनी महासभेत सर्व विभागातील अधिकाऱ्यांना धारेवर धरले.**



स्व.दिलीप पायगुडे समिती सभागृहात घेण्यात आलेल्या महासभेप्रसंगी आयुक्त दगडे-पाटील यांच्यासमवेत अति.आयुक्त करूणा डहाळे, उपायुक्त शोभा बाविस्कर, उपायुक्त बाळासाहेब तट्टु, सहा.उपायुक्त किशोर सुडके, नगररचना विभागाचे परदेशी, अतिक्रमण विभागाचे प्रसाद जाधव यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. महासभा सुरू असतांना आयुक्त तथा प्रशासक अमिता दगडे-पाटील बोलतांना पुढे म्हणाल्या की, मनपाचा शिपाई कैलास गुलाब चौधरी याला ठेकेदार रमेश बागुल-चौधरी यांनी कार्यालयात कानशिलात लगावल्याची घटना घडली. तत्कालिन नगरसेवकांनी वाढवुन ठेवलेली बीले देणे ही माझी जबाबदारी नाही. आवक असेल तर बीले ही दिले जातील. मनपातील कर्मचाऱ्याला ठेकेदार मारतो. एकत्र रहा ही वेळ **(पान ४ वर)**

## बायोमेट्रिक हजेरीसाठी वेतन टप्पा थांबवू नका शिक्षक भारती विनाअनुदानित संघर्ष समिती

**धुळे, दि.१४- अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे बायोमेट्रिक हजेरी साठी वेतन व टप्पा अनुदान थांबविण्यात येऊ नये यासाठी शिक्षण मंत्री दादा भुसे यांना मेल द्वारे शिक्षक भारती विनाअनुदान विरोधी संघर्ष समितीतर्फे निवेदन पाठविण्यात आले आहे.**

शिक्षण विभाग मंत्रालय, पुणे आयुक्त यांनी काढलेल्या पत्रात नमूद केल्यानुसार शासन निर्णय दि.६/२/२०२३ मधील अट क्र.६ व १२ आणि शासननिर्णय दि.१४-१०-२०२४ मधील अट क्र.५ व ११ अन्वये अनुदान पात्र शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती बायोमेट्रीक प्रणालीद्वारे नोंदविण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. ज्यावेळी अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांना अनुदान देण्याची प्रक्रिया सुरू झाली तेव्हाच ही अट महाराष्ट्रातील सर्व शाळांनी पूर्ण करून शाळास्तरावर त्यापद्धतीने कार्यवाही चालू आहे.

परंतू शिक्षण संचालनालय पत्र क्र.४ नुसार अंशतः अनुदानित शाळांना देण्यात आलेल्या अटीचे पालन न करणाऱ्या शाळांचे वेतन अनुदान रोखण्याचा तुघलकी निर्णय मात्र निषेधार्ह आहे. अनुदानित शाळांना अशा कोणत्याही जाचक अटी घालत नाही मात्र महाराष्टातील अंशतः अनुदानित शाळांना सापत्नीक अशी वागणूक शासन देत आहे. शासनाचा टप्पावाढ अनुदान रोखण्यासाठीचा हा एक कुटील डाव आहे.

तरी १३-०१-२०२५ पर्यंत सर्व उपसंचालक, सर्व शिक्षणाधिकारी यांना सदर यादी देण्याचे निर्देश आहेत. जरी यात माहिती उपलब्ध झाली नसेल तरी अशा सर्व महाराष्ट्रातील कोणत्याही अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळेचे वेतन रोखण्यात येऊ नये याबाबत शिक्षणमंत्री दादा भुसे यांना शिक्षक भारती विनाअनुदान विरोधी संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य यांचे वतीने मेल द्वारे निवेदन पाठविण्यात आले आहे . वेतन रोखल्यास आंदोलनाचा इशारा शिक्षक भारती विनाअनुदान विरोधी संघर्ष समिती राज्याध्यक्ष जयवंत भाबड, राहुल पाटील, रुपाली कुरुमकर, अशपाक खाटीक, जनार्दन गायकवाड ,कैलास अमृतकर इत्यादी यांनी दिली आहे.



## विठ्ठल रूखमाई पतपेढी चोरट्यांनी फोडली: पाच लाखांचा ऐवज लंपास

**सोनगीर दि. १४ (प्रतिनिधी )येथील विठ्ठल रुख्माई नागरी सहकारी पतसंस्थेच्या कार्यालयाची लोखंडी खिडकी तोडून अज्ञात चोरट्यांनी सुमारे पाउणे पाच लाख रुपयांच्या ऐवज लंपास केला आहे. चोरीच्या तपासासाठी पोलिसांनी श्वान पथक व ठसे तज्ञांना पाचारण केले होते.**

येथील रथ चौकात विठ्ठल रुक्मिणी नागरी सहकारी पतसंस्थेचे दुमजली कार्यालय आहे. काल दुपारी नेहमीप्रमाणे पतसंस्थेचे कामकाज आटोपून पतसंस्थेचे कार्यालय बंद **(पान ४ वर)**

## किमती मोबाईलचे कर्ज चढवून परस्पर विक्री खुशाल सोनार,गणेश चौधरीला पोलीस कोठडी

**धुळे, दि.१४- धुळे व तालुक्यातील अनेकांना हातोहात फसवणाऱ्या खुशाल रवींद्र सोनार व गणेश चौधरी यांना न्यायालयाने जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. याच गुन्ह्या प्रमाणे अनेकांना फसवण्यात खुशाल सोनारचा हात असल्याने सखोल चौकशी होणे गरजेचे झाले आहे. दुसऱ्याच्या नावाने मोबाईल असताना त्याच्या पावत्या दाखवून कमी किमतीत आयफोन घेणाऱ्यांची तसेच यासाठी मध्यस्थी करणाऱ्यांची देखील चौकशी होणे गरजेचे झाले आहे. या प्रकरणातील प्रसाद सज्जन चौधरी हा पोलिसांना सापडून आलेला नाही.**

मिल परिसरातील गणेश छोटू बोराटे यांनी दाखल केलेल्या फिर्यादीवरून धुळे शहर पोलीस ठाण्या तर्फे चौकशीची चक्रे फिरू लागली आहे. या प्रकरणात शहर पोलिसांनी खुशाल रवींद्र सोनार(पूर्वआश्रमीचा फायनान्स कंपनीचा कर्मचारी) व गणेश चौधरी (सॅमसंग कंपनीचा प्रमोटर) यांना शहर पोलिसांनी अटक केली आहे. आज न्यायालयाने दोघांना जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.फिर्यादी गणेश छोटू बोराटे याच्या झालेल्या फसवणुकीची रक्कम तीन लाख पंधरा हजार असली, तरी त्यांच्या जीवनात एवढ्या मोठ्या फसवणुकीमुळे मोठा परिणाम होणार आहे.अशाच प्रकारे धुळे शहर,मुकटी तसेच तालुक्यात फसवणूक झाली असल्याचे दिसत आहे. सामान्य जनतेच्या अज्ञानाचा फायदा घेत ही फसवणूक झाली,ही वस्तुस्थिती आहे. त्यांनी ओ.टी.पी का दिला?असा सवाल करून उलट प्रश्न विचारला जात आहे.इथेच पोलिसांच्या तपासाची कसब लागणार आहे. फायनान्स कंपनीचा माणूस अशा लोनच्या मदतीने मोबाईल अथवा इतर किमती वस्तू विक्रीच्या ठिकाणी उपलब्ध असतो. मोबाईल कंपनीचा देखील माणूस त्या ठिकाणी असतो.त्याच प्रमाणे स्वतः दुकान मालक देखील या प्रक्रियेमध्ये सहभागी असतो. या सगळ्यांची जबाबदारी काय?हा मुख्य प्रश्न यामध्ये तयार झाला आहे.केवळ मोबाईल विकणे एवढाच दुकानदाराचे काम नसून तो योग्य माणसाला दिला जातो **(पान ४ वर)**



## उद्यानाचे महाशिवरात्रीला लोकार्पण मा.आ.चंद्रकांत रघुवंशी यांची माहिती

**नंदुरबार, दि.१४- (प्रतिनिधी)-शहरातील निर्मणाधीन असलेल्या शिवधाम उद्यानाचे लोकार्पण येत्या महाशिवरात्रीला करण्यात येणार आहे अशी माहिती रविवारी शिवसेनेचे संपर्कप्रमुख तथा माजी आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी दिली. दरम्यान, रघुवंशी यांनी काल शिवधाम उद्यानाची पाहणी केली.**

प्रसिद्ध शिव कथाकार पं. प्रदीप मिश्रा गेल्या वर्षी नंदुरबार येथील छत्रपती मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटलचा उद्घाटनाला आले असता त्यांनी शहरात शिवधाम उभारण्याचा मनोदय बोलून दाखवला होता. त्यानुसार, शिवसेनेचे संपर्कप्रमुख तथा माजी आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी नगर विकास विभागाकडे वेळोवेळी पाठपुरावा व्यक्त केला. **(पान ४ वर)**

## खड्डे नसणाऱ्या रस्त्यावर चाळीस लाखांचे दुरुस्तीचे टेंडर मनपा बांधकाम विभागाचा प्रताप- शिवसेनेचा आक्षेप

**धुळे, दि.१४- धुळे शहरातील विठ्ठल मंदिर ते स्टेशन रोड फाशी फुल ते कल्याण भवन पर्यंत मॉडेल रस्त्याचे काम २०१९ साली पूर्ण करण्यात आले. वाहतुकीसाठी धुळे शहरात अत्यंत महत्त्वाचा हा रस्ता समजला जातो. धुळे महानगरपालिका प्रशासनाने दि. ३ जानेवारी रोजी टेंडर नोटीस प्रकाशित करून विठ्ठल मंदिर स्टेशन रोड ते कल्याण भवन पर्यंतचा रस्ता खड्डे बुजवणे यासाठी ४० लाख रुपयांचे टेंडर नोटीस प्रकाशित करण्याचा प्रताप महापालिकेतील बांधकाम विभागाने केला आहे. असा आरोप शिवसेना उबाठाने केला आहे.**



संतोषी माता मंदिर ते फाशी पूल फाशी पूल ते स्टेशन रोड, स्टेशन रोड ते विठ्ठल मंदिर असा हा रस्ता तीन भागात जोडला जातो. या रस्त्याच्या दुतर्फा फक्त रेल्वे स्टेशन समोर व स्टेशन रोडवरील नवले क्रॉसिंग समोर दोन खड्डे पडलेले आहेत. फक्त या दोन खड्डे दुजविण्याच्या कामासाठी महानगरपालिकेने तब्बल ४० लाख रुपयांची टेंडर नोटीस प्रकाशित केले असून मृताच्या टाळूवरचे लोणी खाण्याचा हा प्रकार आहे. या खड्ड्यांची डागडुजी फक्त काही हजारात होत असताना तब्बल ४० लक्ष रुपयांची टेंडर नोटीस प्रकाशित करणे म्हणजे या प्रकाराला महानगरपालिका आयुक्तांचा पाठिंबा आहे का ? असा प्रश्न विचारात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षा वतीने आज मनपा आयुक्त यांना निवेदन देत जाब विचारला.

ई टेंडर नोटीस लवकरात लवकर रद्द करण्यात यावी अशी आग्रही मागणी **(पान ४ वर)**

## गायक कैलास खेर उद्या दोंडाईचात

दोंडाईचा, दि.१४- राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा शिंदखेडा मतदारसंघाचे आमदार जयकुमार रावल यांच्या वाढदिवसानिमित्त उद्या दि. १६ गुरुवारी बॉलिवूडचे सुप्रसिद्ध गायक कैलास खेर हे दोंडाईचा येथे येत असून त्यांचा गीत गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

शिंदखेडा मतदारसंघाचे आमदार, राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांचा दि. १६ जानेवारी रोजी वाढदिवस असून त्या निमित्ताने बॉलिवूडचे प्रसिद्ध गायक कैलास खेर यांचा दोंडाईचा येथे दि. १६ रोजी गुरुवारी संध्याकाळी ६:३० वाजता दोंडाईचा येथील आप्पासाहेब मैदान येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने कैलास खेर यांनी एक व्हिडिओ प्रकाशित करून **(पान ४ वर)**

## शिरपूर केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन जिल्ह्यातुन कुस्तीगीर सहभागी होणार

**शिरपूर, दि.१४- केसरी नंदन बहुउद्देशीय संस्था तर्फे शिरपूर केसरी कुस्ती स्पर्धेचे दि.१८ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता आयोजन करण्यात आले आले असून जिल्हाभरातून कुस्तीगीर सहभागी होणार आहेत.**



शिरपूर तालुका व शहरात कुस्ती क्षेत्रात नावलौकिक वाढेल व कुस्तीच्या प्रचार व प्रसारासाठी तसेच स्थानिक कुस्तीपटूंना प्रोत्साहन मिळेल यासाठी या कुस्तीगिरांना प्राविण्य मिळेल व होतकरू कुस्तीकरांना या उद्देशाने शिरपूर नगरीत दुसऱ्यांदा शिरपूर केसरी कुस्ती स्पर्धा २०२५ पित्रेश्वर रिक्षा स्टॉप निमझरी नाका येथे **(पान ४ वर)**





## नंदुरबारच्या रोटरीतर्फे अस्थी व्यंग सुधारक शस्त्रक्रीया तपासणी शिबीर

**नंदुरबार, दि. १४- रोटरी क्लब ऑफ नंदनगरी, रोट्रक्ट क्लब ऑफ नंदनगरी, डॉ. हेडगेवार सेवा समिती नंदुरबार तसेच रोटरी डिस्ट्रिक्ट ३१४१ व ३१४२० च्या विविध रोटरी क्लब च्या संयुक्त विद्यमाने नंदुरबार येथील जिल्हा रुग्णालयात मोफत अस्थी व्यंग (दिव्यांग) सुधारक शत्रक्रिया पूर्व तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.**

या मोफत अस्थी व्यंग (दिव्यांग) सुधारक **(पान ४ वर)**

## नंदुरबारला रंगणार राज्य बालनाट्य स्पर्धा

नंदुरबार, दि.१४(प्रतिनिधी)- राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत नंदुरबार येथे प्रथमच २१ वी महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा होत आहे. सदर स्पर्धा दि.१५ ते १७ जानेवारी २०२५ दरम्यान शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नाट्य मंदिर येथे होणार आहे.

महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी राज्यात १० वेगवेगळया केंद्रांवर आयोजित करण्यात आलेली आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. नंदुरबार जिल्ह्यातील एकूण १९ नाट्य संस्था, **(पान ३ वर)**

## बांगलादेशातील हिंदूवर अत्याचार मोदी सरकारमुळेच- मा.आ.गोटे

**धुळे, दि.१४- बांगलादेशच्या बडतर्फ पंतप्रधान श्रीमती शेख हसीना यांना मोदी सरकारने राजाश्रय दिल्यामुळेच बांगलादेशातील निरपराध हिंदूवर अत्याचार होत आहेत, असा गंभीर आरोप शिवसेना नेते शिवसेना नेते, माजी आमदार, कार्यसम्राट अनिल गोटे यांनी एका पत्रकाद्वारे केला आहे.**



आपल्या पत्रकात ते पुढे म्हणतात की बांगलादेशात क्रांती होऊन तेथील पंतप्रधान शेख हसीना यांना बांगलादेशातून आपल्या देशात पळवून आणणाऱ्या विमानासह मोदी सरकारने राजाश्रय दिला असल्यामुळे व बांगलादेशातील नव्या सत्ताधाऱ्यांनी सातत्याने श्रीमती शेख हसीना यांना आपल्या ताब्यात द्या. अशी मागणी करूनही केंद्रातील भाजपचे नरेंद्र मोदी सरकार काहीही निर्णय घेत नाही. याचीच प्रतिक्रिया म्हणून बांगलादेशात पिढ्यानपिढ्या वास्तव्य करणाऱ्या व बांगलादेशास आपली जन्मभूमी तसेच कर्मभूमी मानणाऱ्या हिंदूंचा छळ होत आहे. निरपराध, निष्पाप **(पान ३ वर)**

## आदिवासी संमेलनास जाणाऱ्यांना टोल माफ करा

शिरपूर, दि.१४- आदिवासी सांस्कृतिक एकता महासंमेलन, पानखेडा पिंपळनेर कार्यक्रमाला येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांना टोल मुक्त करण्यात यावे अशी मागणी आमदार काशिराम दादा पावरा, भूषण मोरे, यशवंत पावरा व आदिवासी संघटनेकडून करण्यात आली आहे.

दरवर्षी प्रमाणे या वर्षी ३२ वे आदिवासी सांस्कृतिक एकता महासंमेलन पानखेडा, पिंपळनेर येथे आयोजित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने संपूर्ण भारतातील आदिवासी बांधव मोठ्या संख्येने सहभागी होत असतात. सदर कार्यक्रम दि.१३ ते १५ जानेवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे. धुळे जिल्यातील चारही बाजूला **(पान ३ वर)**

भावपूर्ण श्रद्धांजली



स्व.सौ.रमादेवी विनोद अग्रवाल
(मृत्यू दि.०९/०१/२०२५)

मनी होता भोळेपणा, कधीही न दाखवला मोठेपणा अजूनही होतो भास, तुम्ही आहात जवळपास...
आपल्या पावन स्मृतिस विनम्र श्रध्दांजली!

-: श्रध्दावनत: :-
अग्रसेन मॉर्नींग वॉक ग्रुप
अग्रवाल नगर, धुळे

# आपला महाराष्ट्र

## वैभवा कडून पतनाकडे मराठी साहित्याचा प्रवास

मराठी साहित्य एके काळी प्रचंड वैभवशाली होते. शंभर वर्षांपूर्वीचे काव्य आणि गद्य साहित्य आजही अजरामर आहे. ते भलेही कलावादी कोणी म्हणत असले तरी त्याचे महत्त्व कमी झालेले नाही. मात्र ते अलीकडे कमी झालेले दिसते. माझा मराठीची बोलू कौतुके, परी अमृता तेही पैजासी जिंके, ऐसी अक्षरे रसिके मेळवीन !! असे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी म्हटलेले आहे. प्रसंगी अमृतालाही पैजांनी जिंकणारी अक्षरे मेळवीन म्हणजे निर्माण करेन. असे ज्ञानदेव म्हणतात. मराठीचा गोडवा असाच आहे. महाराष्ट्रातील असंख्य सारस्वतांनी ज्ञानदेवांचे हे मनोगत पुढे नेऊन मराठी साहित्य समृद्ध केलेले आहे. त्या सारस्वतांची नामावली मोठी आहे. एक शोधावा तर हजार मिळतील अशी मराठी साहित्यातील संपत्ती आहे. मात्र बराच काळ हे साहित्य रसिकाचे मनोरंजन करणारे ठरले असले तरी आणि मराठी भाषा समृद्ध करणारे ठरले असले तरी बहुजनांपर्यंत ते पोहोचलेले नव्हते. अभिजनां पर्यंतच ते मर्यादित होते. त्यामुळे बहुजनांसहित समाजातील जो काही उपेक्षित घटक होता त्याची भावनात्मक स्पंदने अनंत काळ दबलेली होती. महाराष्ट्रातील समाज सुधारकांनी शिक्षणाची आणि परिवर्तनाची प्रक्रिया महाराष्ट्रात सुरू केली आणि उपेक्षितांच्या साहित्याला घुमारे फुटले. आज विद्रोही साहित्य संमेलन, सत्यशोधकी साहित्य संमेलन, आदिवासी साहित्य संमेलन, कामगार साहित्य संमेलन, स्त्री साहित्य संमेलन अशा कितीतरी साहित्य वाहिन्या जन्माला आल्या. त्या साहित्याने त्या त्या गटातील स्पंदनांची नोंद घेतली. त्याचा परिणाम असा झाला की समाजाच्या शेवटच्या माणसापर्यंत आज मराठी साहित्य पोहोचलेले आहे. मराठी साहित्य संमेलनाला पर्याय म्हणून वेगळ्या साहित्य संमेलनाचे आयोजन केले जाते. त्यात विचारवंतांची उपस्थिती असते आणि वैचारिक मेजवानी असते. मराठी साहित्य संमेलनातही वैचारिक मेजवानी असते परंतु ते गेल्या काही वर्षांपासून राजकीय क्षेत्रातील लोकांनी व्यापलेले असते. ज्याला साहित्यातील सा देखील माहिती नाही असे लोक मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन करतात किंवा त्याचा समारोप करतात आणि साहित्यिकांना उपदेश करतात. ही अवस्था खुद्द साहित्यिकांनीच स्वत:वर ओढवून घेतलेली आहे. आपल्या जवळच पूज्य साने गुरुजींच्या कर्मभूमीत अमळनेरला दोन्ही साहित्य संमेलने झाली. त्यापैकी एकात काही राम नव्हता. विद्रोही साहित्य संमेलन मात्र गाजले. हे संमेलन लोकांच्या मदतीने लोकांकडून लोकांकडे जाणारे होते. तर मराठी साहित्य संमेलन सरकारी मदतीतून साजरे झाले. साहित्यिकांनी तिथे चंगळ केली. साहित्य संमेलनाचा सिम्बॉल कसा असावा यापासून हे संमेलन टीकेचे लक्ष ठरले. शेवटी जे सरकार महाराष्ट्रात कार्यरत होते त्या सरकारच्या प्रतिनिधींनी सगळी व्यवस्था आपल्या हातात घेतली होती. तसेच साने गुरुजींच्या पुरोगामी विचारसरणीच्या भूमीत प्रतिगामी शक्तींनी संमेलनाची सूत्रे स्वत:च्या ताब्यात ठेवली होती. स्थानिक अध्यक्ष तर सुरुवातीपासूनच शरण गेले होते. आजही त्यांच्या नावाने लोक खडे फोडतात. इतक्या वाईट अवस्थेत हे संमेलन पार पडले. सरकार मराठी साहित्य महामंडळाला संमेलनासाठी आता कोटी ने पैसे देते. त्यामुळे साहित्य जनांनी लाचार होणे स्वाभाविक ठरते. स्वाभाविकच मराठी साहित्य पूर्वीच्या वैभवा कडून पतनाकडे निघाल्याचे स्पष्ट दिसते.

या वर्षाचे मराठी साहित्य संमेलन राजधानी दिल्लीत आहे.त्या साहित्य संमेलनाचे स्वागत अध्यक्ष ज्येष्ठ नेते शरदराव पवार आहेत. याचा अर्थ राजकीय क्षेत्रातील हस्तीशिवाय आता संमेलने यशस्वी होत नाहीत हे सिद्ध झाले आहे. या संमेलनासाठी दिल्लीत दाखल होणाऱ्या साहित्यिकांना रेल्वेने स्लीपर क्लासचे तिकीट देखील सवलतीत देण्याचे नाकारले आहे. महाराष्ट्र सरकारने त्यांच्या ताब्यातील महाराष्ट्र सदन निशुल्क वापरण्यासाठी दिलेले असले तरी साहित्यिकांसाठी एका बाजूच्या प्रवास भाड्याची जबाबदारी सरकारने घेतली पाहिजे यासाठी महामंडळाने मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे की दिल्ली पर्यंतचे दुसऱ्या वर्गाचे प्रवास भाडे देखील साहित्यिक खर्च करू शकणार नाहीत. इतकी हतबलता त्यांनी व्यक्त केलेली दिसते. ही परिस्थिती वास्तववादी नाही. दिल्लीपर्यंतचे स्लीपर क्लास चे तिकीट एक हजार रुपयांच्या आतच आहे. तेवढेही साहित्यिकांच्या खिशाला परवडणारे नाही असे म्हणणे चुकीचे होईल. काही अपवाद वगळले तर बहुतेक साहित्यिक हे सुखवस्तू आहेत. असे असताना त्यांनी इतके लाचार होण्याचे कारण काय ? अशा लाचारीमुळे त्यांनी आपले सत्व आणि स्वत्व गमावले आहे. त्यातल्या त्यात ज्येष्ठ नेते शरदराव पवार पूर्वीपासून साहित्यिकांच्या गोतावळ्यात वावरत आलेले आहेत. त्यांनी संमेलनासाठी मदत देखील केलेली आहे. त्या त्या वेळेच्या मुख्यमंत्र्यांना त्यांनी मदत देण्याची शिफारस देखील केलेली आहे. ते व्यासंगी आहेत. त्यामुळे साहित्यिकांचे आणि त्यांचे जमते. साहित्यिकांशी त्यांची असलेली सलगी पु ,ल, देशपांडे आणि त्यांच्या समकालीन असलेले तोलामोलाचे साहित्यिक यांच्याशी होती आणि आहे. ना.धों. महानोर यांच्यासारख्या मराठमोळ्या साहित्यिकावर त्यांनी अतोनात प्रेम केले. त्यांना आमदार केले. त्यांच्या जलसंधारण कार्यक्रमाचा उपयोग आमदारकीच्या माध्यमातून करून घेतला. म्हणून शरदराव पवार यांच्या संदर्भात कोणी आक्षेप घेणार नाही. मुद्दा असा आहे की ज्या काही डझनाहून अधिक राजकीय पुढाऱ्यांची हजेरी या साहित्य संमेलनात लागणार आहे त्यामुळे ते साहित्य संमेलन आहे की राजकीय पक्षाचे संमेलन आहे असा प्रश्न पडावा इतकी गर्दी त्या संमेलनात राजकारणी लोकांची असणार आहे. अर्थातच त्याचा परिणाम असा होईल की,साहित्य बाजूला राहील आणि राजकारण हे साहित्य बनेल. ते खेळणाऱ्यांची वाहवा होईल. त्यापेक्षा अशी संमेलने हवीतच कशाला असे प्रश्न सहज उपस्थित होतात. जर संमेलन साजरे करायचेच असेल तर साहित्यिकांनी पदरमोड करून आणि लोकांकडे जाऊन साध्या सोप्या पद्धतीने संमेलने भरवावीत. कोणाही राजकारण्याच्या कच्छपी न लागता संमेलने यशस्वी करावी, स्वाभिमान जागा ठेवावा आणि मनमुराद आनंद लुटावा. तसे जर केले नाही तर मराठी साहित्याचा पुढचा काळ ऱ्हासाचा आहे. आधीच शिक्षण क्षेत्रात मराठी चे तीन तेरा वाजले. अर्धवट इंग्रजी शाळांनी मराठी शाळांवर मात केली. त्यांच्यावर आक्रमण केले. आणि अशी एक संस्कृती आणली की मराठी साहित्य संमेलनात कितीही गळे काढले तरी मराठीला फारसे महत्व राहणार नाही. अशी स्थिती नजीकच्या काळात निश्चितपणे येणार आहे.

अनेक साहित्य संमेलनात राजकीय क्षेत्रातील लोक नकोत अशी भूमिका मांडली गेली. परंतु गेली ९७ वर्षे एखादा अपवाद वगळला तर राजाश्रय घेण्याचा मोह साहित्यिकांना आवरता आलेला नाही. दिल्लीत हो९णारे मराठी साहित्य संमेलन महाराष्ट्रातील राजकीय क्षेत्रातील लोकांच्या उपस्थितीने भरगच्च होणार आहे. तद्वतच गैरमराठी पुढाऱ्यांना देखील तिथे बोलावले जाणार आहे. तीन दिवसांच्या संमेलनातील विविध चर्चासत्रात सुमारे १५ राजकीय नेते उपस्थित राहणार आहेत. संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते होईल. डबल इंजिन सरकार असल्यामुळे ते स्वाभाविक आहे. विशेष म्हणजे या संमेलनात लोकसभेच्या माजी अध्यक्ष सुमित्रा महाजन, काँग्रेसचे नेते सुशील कुमार शिंदे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मनसेचे राज ठाकरे, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या प्रकट मुलाखती होणार आहेत. याचा अर्थ स्पष्ट आहे की एखाद्या साहित्यिकाची भलेही प्रकट मुलाखत होऊ शकते परंतु ती या सर्व राजकीय नेत्यांच्या मुलाखतींच्या गर्दीत झाकोळून जाणार आहे. पुढच्या काळात मराठी साहित्य राजकीय क्षेत्रातील गणगांच्या गोडव्याने समृद्ध होणार की काय अशी स्थिती निर्माण झालेली आहे. तसाही अलीकडचा साहित्याचा दर्जा आणि ९७ वर्षांपूर्वीचा साहित्याचा दर्जा यात जमीन अस्मानचा फरक आहे. त्यातच ते राजकीय क्षेत्राने व्यापले जात असेल तर पारंपरिक मराठी साहित्याची गरजच उरणार नाही. परिणामी जे विद्रोही साहित्य संमेलन जन्मले ते बहुजनांचा आवाज म्हणून पुढे येणे योग्यच म्हणावे लागेल. त्यांनी मात्र राजकीय क्षेत्राच्या दूरच राहावे असे वाटते.

## प्रा.चंद्रकांत सोनारांच्या उपकरणाची राज्य. विज्ञान प्रदर्शनासाठी निवड

**सोनगीर, दि,१४ (प्रतिनिधी)– श्रीमती मंदाकिनी टोणगावकर रोटरी इंग्लिश स्कूल दोंडाईचा येथे ४५ व्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात डॉ. पां रा घोगरे कनिष्ठ महाविद्यालय शिरपूरचे प्रा. चंद्रकांत सदाशिव सोनार यांना माध्यमिक शिक्षक गटातून प्रथम पारितोषिक मिळाले. त्यांच्या उपकरणाची अमरावती येथे होणाऱ्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली.**

मिस्ट्री बुक हे उपकरण मानवीय शरीराची आंतररचना व प्रत्येक अवयवाचे कार्य कशा पद्धतीने चालते हे विद्यार्थ्यांना समजून सांगण्यासाठी एक वर्किंग मॉडेल आहे. ते टाकाऊ वस्तूंपासून तयार केलेले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. मुकुंदजी सोहोनी , हैदरभाई नुरानी , तहसीलदार संभाजी पाटील यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले.प्रा सोनार हे विज्ञान प्रदर्शनात तालुका ,जिल्हा ,राज्य व राष्ट्रीय स्तरावर भौतिकशास्त्र विषयाचे थिंक लॅब हे उपकरण विकसित करून त्याचे पेटंट मिळविले होते. विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे व उपयोगी आणि हाताळण्यासाठी सोपे असे हे उपकरण होते. थिंक लॅब या प्रायोगिक उपकरणाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली. प्रा.सोनार हे दरवर्षी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाची सुरुवात करतात आणि राज्यस्तरावर आपले प्रयोग आणि उपकरण घेऊन जातात . प्रा सोनार यांची तालुका स्तरीय १७ वेळेस, जिल्हास्तरीय १४ वेळेस, राज्यस्तरीय १४ वेळेस सहभाग नोंदवला व त्यात रतनागिरी येथे राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक आणि मुंबई येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे.

कि.वि.प्र.संस्थेचे अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, सचिव निशांत रंधे, खजिनदार आशाताई रंधे, विश्वस्त रोहित रंधे, प्राचार्य प्रा.एस.एस. राजपूत, उपप्राचार्य प्रा.व्ही.ए. चव्हाण , डॉ.दिनेश भक्कड , डॉ.आबासाहेब देशमुख, पर्यवेक्षक प्रा.आर.के. पाटील यांनी अभिनंदन केले.

## पूज्य साने गुरुजी कनिष्ठ महा.त ई-कचरा संकलन केंद्रास मान्यता

**शहादा,दि.१४(का.प्र.)– पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या कला विज्ञान वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयात ई यंत्रणा २०२५ अंतर्गत ई-कचरा संकलन केंद्रास मान्यता मिळाली असून ई- कचरा व्यवस्थापन जनजागृती आणि संकलनाविषयी कार्यशाळा महाविद्यालयाच्या सभागृहात घेण्यात आली.**




नंदुरबार डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट कौन्सिल व पूर्णम एकोविजन फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने संपूर्ण जिल्ह्यात घेण्यात येणाऱ्या या उपक्रमात आवाहनास प्रतिसाद देत कनिष्ठ महाविद्यालयाने संस्थेच्या नावे रजिस्ट्रेशन करून ई कचरा संकलन केंद्र तयार केले.यांत महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी आणि प्राध्यापक वर्ग स्वयंसेवक म्हणून काम करीत आहेत.त्यासाठी जनजागृतीपर कार्यशाळा संपन्न झाली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा.सौ. कल्पना पटेल होत्या. यावेळी आजच्या विज्ञान व तंत्रविज्ञानाच्या युगात आधुनिक साधनांच्या वापरामुळे मोठ्या प्रमाणात कामात न येणारे प्लास्टिकचे उपकरणे, निकामी साधने वाढलेली आहेत .यामुळे मानवी आरोग्य धोक्यात आले आहे.अशा निकामी वस्तू महाविद्यालयाच्या ई- संकलन केंद्रात आणण्याचे आवाहन त्यांनी केले .आजच्या इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा वाढता वापर,

खराब होणाऱ्या वस्तूंचे दुष्परिणाम, वाढत्या ई- कचऱ्याचे पर्यावरण आणि मानवी जीवनावर होणारा परिणाम व उपाययोजना याविषयीची माहिती प्रा. भारती पाटील यांनी प्रोजेक्टरद्वारे सांगितली.या उपक्रमाचे स्वागत व कौतुक मंडळाचे अध्यक्ष दीपकभाई पाटील, उपाध्यक्ष जगदीश पाटील, सचिव श्रीमती कमलताई पाटील, समन्वयक प्रा.मकरंद पाटील, संचालक मयूरभाई दीपक पाटील, प्राचार्य डॉ. एम.के.पटेल, उपप्राचार्य प्रा.कल्पना पटेल यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.उर्मिला पावरा यांनी केले.यावेळी पर्यवेक्षक प्रा के.एच.नागेश प्रा. व्ही.सी.डोळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रकाश चौधरी यांनी केले.आभार प्रा.मनोज चौधरी यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.डी.डी.पटेल यांनी तंत्रसक्षेही म्हणून कामकाज केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू भगिनी व विद्यार्थी उपस्थित होते.

## प्रशासन कार्यक्षम आणि लोकाभिमुख करण्यासाठी विशेष कृती आराखडा तयार करा: डॉ.मिताली सेठी

**नंदुरबार, दि.१३(प्रतिनिधी)– जिल्ह्यात प्रशासन अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी शंभर दिवसांचा विशेष कृती आराखडा तयार करून सर्व विभागांना त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्री यांच्या सात कलमी कृती कार्यक्रमातील उद्दिष्टानुसार व मार्गदर्शनानुसार, हा आराखडा दि. १५ एप्रिल २०२५ पर्यंत राबवला जाईल. या उपक्रमात नागरिकांच्या सेवेसाठी स्वच्छता, सुव्यवस्था, तक्रार निवारण आणि उद्योगांना गुंतवणूक प्रोत्साहन यांसारख्या महत्त्वाच्या बाबींवर भर दिला आहे.**

नुकत्याच मुख्यमंत्र्यांच्या व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे दिलेल्या निर्देशानुसार, शासकीय विभागांनी शंभर दिवसांमध्ये दि.१५ एप्रिल २०२५ पर्यंत विविध सुधारणा व गतीशील कामकाजाची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. या संदर्भात संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देखील देण्यात आल्या आहेत. या आराखड्यांतर्गत जिल्हा प्रशासनाच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्यासाठी ठोस उपाययोजना डॉ. मित्ताली सेठी यांच्याकडून सुचवण्यात आल्या आहेत. स्वच्छता मोहिमेपासून नागरिकांसाठी जलद आणि परिणामकारक सेवा पुरवण्यापर्यंत, या आराखड्यात अनेक लोकोपयोगी उपक्रमांचा समावेश आहे. तक्रारींचे त्वरित निराकरण, गुंतवणूकदारांसाठी अनुकूल वातावरण तयार करणे, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि शाळांमधील समस्या सोडवण्यावर भर दिला गेला आहे.

हा आराखडा प्रशासन आणि नागरिक यांच्यातील अंतर कमी करून विश्वासार्हता निर्माण करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयत्न ठरणार आहे. जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी सर्व विभाग प्रमुखांना या आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी स्पष्ट सूचनाही दिल्या आहेत. दि. २० जानेवारी २०२५ रोजी या कृती आराखड्याच्या प्रगतीचा आढावा घेतला जाणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी नमूद केले आहे.

## सुट्रेपाडातील यात्रेसाठी पोलीस बंदोबस्त द्यावा

धुळे, दि.१४– धुळे तालुक्यातील सुट्रेपाडा येथे दि.२० व २१ जानेवारी रोजी सती माता यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रोत्सवाला कोणतेही गालबोट लागु नये यासाठी दोन दिवस पोलीस बंदोबस्त देण्यात यावा.अशी मागणी आदर्श मल्हार बहुजन सेना ऑल इंडिया संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे.


सुट्रेपाडा आनंदखेडा येथील ग्रामदैवत सती माता यात्रेसाठी परवानगी, दि.२० जानेवारी रोजी सकाळी आठ वाजता मांड्व मिरवणुक, दहा वाजता ध्वज व महाआरती. संध्याकाळी चार वाजता तगतराव मिरवणुक, संध्याकाळी सात वाजता महाप्रसाद, दि.२० व २१ रोजी रात्री मनोरंजन म्हणून तमाशाचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रोत्सव काळात शांतता रहावी यासाठी दोन दिवस पोलीस बंदोबस्त देण्यात यावा. अशी मागणी संघटनेचे अभिलाल देवरे, सुट्रेपाडा ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.

## कवी कट्टातर्फे कवी संमेलन

धुळे, दि.१४– येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी कवी कट्टयातर्फे कवी संमेलनाचे आयोजन दि.१९ जानेवारी रोजी सकाळी दहा वाजेपासून कृष्णा मेडिकोज स्वामी विवेकानंद अभ्यासिके समोर दत्त मंदिर चौक ते स्वामीनारायण मंदिर रोड, देवपूर धुळे येथे करण्यात आले आहे.

समेलनात सहभागाचे आवाहन समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.क.उ.संघवी यांनी केले आहे.

### शब्दकोडे क्रमांक.२०७६



**आडवे शब्द :** १.वेदना देणारे ४.वितरण करणारे ८.चपाती भाजण्याचे साधन ९.प्रियकर १०.धनी १२.गुपित उघडे करणे, एखाद्या गोष्टीचे सविस्तर केलेले वर्णन १४.उथळ-विरुद्ध १५.ऐट,मिजास १६.जीवानिशी मारणे वा मेलेला १८.थंड २०.कंकण २२.आश्चर्यकारक २६.बोटांवरील कडक आवरण २८.ठेका ३०.टोल वसुलीचे ठिकाण ३१.घुसळून केलेली डाळ ३२.मनोनिग्रह ३४.जलाशयाचा तळ ३५.गोरा-विरुद्ध ३६.गज ३८.करण्यास सोपा ४०.धन-संपत्ती ४१.इच्छा ४३.एक प्रकारची शेंग भाजी ४५.आजार ४६.रियाज ४८.कपोल ४९.एखादी मुर्ती बनवण्यासाठी वापरताय तो □प ५०.गण-उलट लिहा ५२.आप्त सोयरे नातेवाईक ५३.वेष्टण,आच्छादन **उभे शब्द :** १.पगार २.औषध ३.पती ४.यश ५.देह ६.जास्तीत जास्त मर्यादा ७.पश्चयाविणा मिळणारा ११.चिकटून राहणे,दाट मश्री १२.प□वानांचा पौष्टिक आहार १३.जीवनावश्यक वस्तूंची केलेली साठवण १४.गावाचा महसूल गोळा करणारा अधिकारी १७.इंग्रजीत-धाव १८.चारीत्र्य,स्वभाव, वर्तन १९.जंगलातील जनावरांची पाणी पिण्याची जागा २१.डाळ वाढण्याचे साधन २३.हिंदीत-वेळ २४.लेखणी २५.सुधारणा २७.दूध आटवून तयार केलेला पदार्थ २९.चोरांना पकडण्यासाठी रचलेला व्यूव्ह ३३.देखरेख,पहारा ३५.रात्री चमकणारा किटक ३६.अतुट, एकाच रांगेत एकामागोमाग एक असलेले ३७.मरेपर्यंत ३९.जुलाब ४१.चुलता ४२.शरीरातल्या सप्तधातूंप□ी एक,मासकण ४४.ग्रामिण बोलीत-रक्त ४५.मंथन ४७.व्देष ४९.प्रामाणिक मनुष्य ५१.समूह

शब्दकोडे क्रमांक.२०७५ चे उत्तर



## ईदगाह फायर बट परिसरात गोळीबार सराव; प्रवेशबंदी

नंदुरबार, दि.१४– गोळीबार सरावासाठी नंदुरबार शहरातील ईदगाह फायर बट परिसरात जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ अंतर्गत कलम १६३ (२) व (३) नुसार आदेश जारी करत, १५ जानेवारी २०२५ ते ३१ जानेवारी २०२५ दरम्यान सकाळी ६:०० ते सायंकाळी ६:०० या वेळेत प्रवेशबंदी लागू केली आहे.

वार्षिक गोळीबार सराव कार्यक्रम सुरक्षिततेने पार पाडण्यासाठी आणि परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याचे या आदेशात जिल्हाधिकारी डॉ.सेठी यांनी नमूद केले आहे.

या परिसरात केवळ सरावासाठी उपस्थित अधिकारी, कर्मचारी व प्रशिक्षक यांनाच परवानगी असेल. सर्वसामान्य नागरिकांना बंदी राहणार आहे.

प्रकाश में ता.८ जिन्दगी एक जुआ




अनिल कपूर, माधुरी अमरिशपुरी, अनुपमखेर शक्ती कपूर भरत कपूर सुरेश ऑबेरॉय












## शिक्षकाकडून मागितली बारा लाखांची खंडणी चार जणांना एलसीबीने शिताफिने पकडले

**धुळे, दि.१४– शहरातील एका शिक्षकाला मोहात अडकवून त्याच्या सोबत अश्लिल व्हिडीओ बनवून सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली. शिक्षकाकडून बारा लाखांची खंडणी मागणाऱ्या चार जणांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिताफिने पकडले आहे.**

पिडीत शिक्षकाने एक महिन्यापुर्वी जी.टी.पी.स्टॉप जवळील एका मुलीशी फेकबुकच्या माध्यमातून जवळीक केली. त्यानंतर दोघेही संपर्कात आले. संबंधित मुलीने शिक्षकाला तीच्या घरी नेले. तेथे निर्वस्त्र होताच तीन जण आले. त्यांनी शिक्षकाच्या अंगावरील कपडे काढून महिले सोबत व्हिडीओ तयार केला आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली. व्हिडीओ व्हायरल होवू नये यासाठी शिक्षकाकडे बारा लाखांची खंडणी मागण्यात आली. याचवेळी शिक्षकाकडील मोबाईलही हिसकावून घेण्यात आला.घटनेची खबर पिडीत शिक्षकाने एलसीबीच्या पथकाला दिली. त्यानुसार जिल्हा पोलीस अधीक्षक धिवरेंच्या मार्गदर्शनाखाली धुळे व नंदुरबार पोलीसांच्या संयुक्तपणे सापा रचला. ठरल्याप्रमाणे खंडणीची रक्कम देण्यासाठी शिक्षक नंदुरबार चौफुलीजवळ जाताच पोलीसांनी चारमधील चौघांना ताब्यात घेतले. याप्रकरणी एका मुलीस आरोपी करण्यात आले असून त्यात देवेश दिपक कपुर (वय १९)रा.तिरूपती नगर, बिलाडी रोड, देवपूर धुळे, हर्षल गोपाल वाघ (वय २१)रा.भगवा चौक, रावेर ता.जि.धुळे, हितेश ज्ञानेश्वर बिऱ्हाडे (वय १९)रा. तिरूपती नगर, बिलाडी रोड,देवपूर धुळे, विनय देवानंद नेरकर (वय २३)रा.फॉरेस्ट कॉलनी, देवपूर धुळे यांना अटक करण्यात आली आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोनि. श्रीराम पवार, पोउनि.प्रकाश पाटील, पोहेकॉ.मायुस सोनवणे,पोहेकॉ. संदीप पाटील, पंकज खैरमोडे, चेतन बोरसे व संजय सुरसे यांनी केली.

## जिजाऊंचा आदर्श प्रत्येक मातेने अंगीकारल्यास स्वप्नपूर्ती निश्चित– प्रा.एल.जी.सोनवणेंचे मत

**साक्री, दि.१४ (प्रतिनिधी)– राजमाता जिजाऊंनी छ.शिवरायांच्या मनात ध्येय पेरण्याचे काम केले म्हणून ते हिंदवी स्वराज्य स्थापन करुन शकले, जिजाऊंनी हा घालुन दिलेला आदर्श प्रत्येक मातेने अंगीकारला तर,आपलीही स्वप्ने निश्चित पुर्ण होतील असे विश्वासात्मक प्रतिपादन प्रा.एल.जी.सोनवणे यांनी केले.**

साक्री येथील छ.शिवाजी इंग्लिश मिडीयम स्कूल मधे जिजाऊ जयंतीदिनी संपन्न झालेल्या माता पालक मेळाव्यात मार्गदर्शन करतांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उ.म. विद्यापिठाचे माजी मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा.एल.जी.सोनवणे बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सदाचार ज्ञान प्रबोधिनी संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर चौधरी हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ माता पालक गोकुळबाई कोळी, दिपाली बागुल व प्राचार्य बी.एम.भामरे उपस्थित होते.

राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस अध्यक्ष, प्रमुख पाहुणे व या प्रसंगी जिजाऊंच्या वेशभुषेत आलेली भाग्यश्री व स्वामी विवेकानंदांच्या वेषात उपस्थित धिरेन या विद्यार्थ्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून व दिप प्रज्वलन करून मेळाव्याचे उद्धाटन करण्यात आले.

या प्रसंगी अंजली बागुल यांनी जिजाऊंच्या कार्याचा तर राजश्री बाविस्कर यांनी स्वामी विवेकानंद यांच्या कार्याचा परिचय करुन दिला.जयश्री झगडे यांनी आईच्या भूमिकेचे महत्व विषद केले.

आपल्या अध्यक्षीय मनोगतात विद्यालयाच्या प्रशासकीय कामाबद्दल प्राचार्य बी.एम भामरे व सर्व सहकारी शिक्षकांच्या कार्याचे कौतुक करत नव वर्षांसाठी शुभेच्छा दिल्यात.मेळाव्यातील खुल्या चर्चेत निशा भदाणे, संगीता सासे, कवीता सैंदाणे, अर्चना चौधरी, ज्योत्सना भदाणे, लीला सारगोट यांनी भाग घेतला. विद्यालयाच्या गीतमंचच्या विद्यार्थ्यीनींनी स्वागत गीत गाऊन सुरुवात झालेल्या या मेळाव्याचे प्रास्ताविक प्राचार्य बी.एम भामरे यांनी, सूत्रसंचालन व मागील सभेच्या प्रोसेडिंगचे वाचन रोहिणी नेरे यांनी, तर आभार प्रदर्शन विद्या बाविस्कर यांनी केले .यशस्वीतेसाठी स्वाती गांगुर्डे, पूनम देवरे व कल्पना सोनवणे यांनी सहकार्य केले.

## श्रीराम विजय महोत्सव शोभायात्रेचे आयोजन

नंदुरबार, दि.१४(प्रतिनिधी)– अयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिर निर्माणाचा वर्षपूर्ती निमित्त नंदुरबार येथे श्रीराम विजय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, कार्यक्रमाची जैय्यत तयारी करण्यात आलेली आहे. सप्ताहभर धार्मिक कार्यक्रमाची रेलचेल असल्यामुळे भाविकांमध्ये उत्साह संचारलेला आहे. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

नंदुरबार शहरातील शहादा–प्रकाशा बायपास रस्त्यावरील कटारिया मॉलचा समोरील १२ एकरच्या मैदानात श्री श्री १०८ श्री महंत परमपूज्य संत श्री तारादासजी बापू यांच्या मार्गदर्शनाखाली दिफ १५ जानेवारी ते २२ जानेवारी पर्यंत श्रीराम विजय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाची जैय्यत तयारी करण्यात येत आहे. या ठिकाणी यज्ञाचे देखील आयोजन करण्यात आले असून, त्यासाठी कुटिया उभारण्यात आलेली आहे. भव्य सभा मंडपाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. रविवारी कार्यक्रम स्थळाची पाहणी श्री १०८ श्री महंत परमपूज्य संत श्री तारादासजी बापू यांनी केली. यावेळी डॉ.स्वप्निल महाजन, डॉ. गौरव तांबोळी, रवी सोनी, छोटू माहेश्वरी, दिलीप पटेल, संजय पटेल यांच्यासह भक्त परिवार उपस्थित होते. कार्यक्रम आयोजक श्रीराम सेवा समिती व जय सियाराम भक्त परिवाराचे सर्व भाविक कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न करीत आहेत.

बुधवार, दि. १५ जानेवारी रोजी पोहोचवायला सुरुवात होणार असून, मोठा मारुती मंदिरापासून सकाळी ९ वाजता शहरातील प्रमुख मार्गांवरून शोभायात्रा काढण्यात येणार आहे. दुपारी १२ वाजेपर्यंत प्रकाशा रस्त्यावरील कटारिया मॉलचा समोरील मैदानात शोभा यात्रेचा समारोप होईल. शोभायात्रेत आदिवासी नृत्य,ढोल ताशांच्या गजर व हरिनामाच्या जयघोष करण्यात येईल.

## लक्झरी बसची धडक दुचाकीस्वार जखमी

**धुळे, दि.१४– दोंडाईचा शहरातील नंदुरबार शहादा चौफुली जवळ भरधाव वेगाने जाणाऱ्या लक्झरी बसने दुचाकीला मागुन धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.**

देवानंद जामसिंग गिरासे यांनी दि.१३ जानेवारी रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, शहादा नंदुरबार चौफुली येथून देवानंद गिरासे हे दुचाकी क्र.एमएच १८/एजी–५५२९ वर बसलेले असतांना दि.५ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी सात वाजता भरधाव वेगाने येणारी लक्झरी बस क्र.एमएच १८/बीजी–९९०४ ने मागुन धडक दिली. गिरासे दुचाकीवरून खाली पडले. त्यांच्या डाव्या पायाला गंभीर दुखापत होवून उजव्या हाताच्या करंगळीला दुखापत झाली. याप्रकरणी लक्झरी चालकाविरोधात दोंडाईचा पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पान १ वरून**

## बांगलादेशातील हिंदूंवर अत्याचार

हिंदूंचे बळी पडत आहेत. बांगलादेशात हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारास केवळ आणि केवळ मोदी सरकारच जबाबदार आहे. दुसरे तिसरे काही नसून मोदी सरकारच्या मुस्लिमांबद्दलच्या द्वेषाची प्रतिक्रिया आहे.

बांगलादेशातील हिंदू बद्दल मोदी सरकारला थोडी जरी कणव असेल तरी त्यांनी केवळ बांगलादेशातील हिंदूंचे प्राण वाचण्यासाठी बांगलादेशच्या बडतर्फ पंतप्रधान श्रीमती शेख हसीना यांचा राजाश्रय काढून घ्यावा. शेख हसीना व मोहम्मद युनूस यांच्यातील अंतर्गत वाद हा बांगलादेशातील राजकारणाचा भाग आहे. त्यांच्या अंतर्गत राजकारणामध्ये भारताने अकारणात नाक खुपसून बांगलादेशातील हिंदूंना मात्र असुरक्षित केले आहे. मोदी सरकारचे फसलेले परराष्ट्रीय धोरण हेच कारणीभूत आहे. फक्त तोंडाने हिंदू–हिंदू करायचे आणि परराष्ट्र्य धोरणात मात्र मुस्लिम राष्ट्रांकडे लोटांगण घालायचे या भोंगळ राजकारणाचा परिपाक हा ताबडतोब थांबविला पाहिजे अशी वस्तुस्थिती मांडणारे पत्रक शिवसेना नेते, कार्यसम्राट माजी आमदार, अनिल अण्णा गोटे यांनी प्रसिद्धीस दिले आहे.

## नंदुरबारला रंगणार राज्य बालनाट्य स्पर्धा

शाळांचा यामध्ये सहभाग आहे. सातत्याने २० वर्ष चालणारी ही बालनाट्य स्पर्धा असून यावर्षी नंदुरबार जिल्ह्याला पहिल्यांदाच केंद्र मिळाले आहे. स्पर्धेत प्रत्येक दिवसाला सहा बालनाट्य प्रयोग होणार असून रोज सकाळी ११ ते दुपारी ५ वाजेपर्यंत प्रयोग सादर होणार आहेत.

